# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.05.2025** **वार:शुक्रवार**

---

1. देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियानाला प्रारंभ; विकसित भारताच्या उभारणीत कृषी क्षेत्राचा विकास महत्त्वाचा-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. राज्यात चार हजार 500 गावांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियान राबवणार
3. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 148 व्या तुकडीचं आज दीक्षांत संचलन; महिलांच्या पहिल्या तुकडीचा समावेश
4. आषाढी वारीतील वारकऱ्यांना विम्याचा लाभ मिळणार-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि
5. आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेला सुवर्णपदक

**कृषी -पंतप्रधान**

देशाच्या कृषी क्षेत्राचा विकास हे विकसित भारताच्या उभारणीतील एक महत्त्वाचं पाऊल ठरेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियानाचा प्रारंभ काल ओडिशामध्ये केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झाला. त्या निमित्तानं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर व्हिडिओ संदेश प्रसारित केला. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना योग्य भाव मिळावा; कृषी अर्थव्यवस्था मजबूत व्हावी यासाठी केंद्र सरकार अनेक उपाययोजना करत आहे असं सांगून पंतप्रधान म्हणाले...

**हमारे किसानों ने रिकॉर्ड उत्पादन करके अन्न के भंडार भरे हैं, लेकिन अब मार्केट भी बदल रहा है और ग्राहक की प्राथमिकता भी बदल गई है। ऐसे में हमारा ये विनम्र प्रयास है कि किसानों को भी और राज्यों की सरकारों को भी और उनके साथ मिलकर कृषि व्यवस्थाओं में बदलाव लाएं, भारत की कृषि और आधुनिक कैसे हो? इस पर किसानों के साथ बैठकर के विचार विमर्श हो, इसलिए इस अभियान के तहत हमारे वैज्ञानिकों की टीम लैब से लैंड, इस एक बड़े महान अभियान को लेकर के आगे जा रही है।**

**कृषिसंकल्प अभियान**

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत देशातल्या 700 जिल्ह्यांमध्ये दोन हजारांहून अधिक कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. देशातील कृषी क्षेत्रासाठी हा ऐतिहासिक दिवस असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल विकसित कृषी संकल्प अभियानाचा प्रारंभ करताना ओडिशामध्ये पुरी जिल्ह्यातल्या साक्षी गोपलन इथं बोलताना सांगितलं. ते म्हणाले....

**ये खेत में जो किसान बैठा है इसके पास वैज्ञानिक आएँगे आपको सारी बात बताएँगे और उसके हिसाब से आप अपनी खेती में सुधार करो और दूसरी चीज़ ये और आपको समस्या आती है तो आप वैज्ञानिकों को बताओ की फलाना रोग लग जाता है फसल बर्बाद हो जाती है यहाँ प्राकृतिक आपदा आती रहती है तो यहाँ कौन कौन-सी फसलें ठीक हो सकती है उसके बारे में भी आपको बताए तो ये वैज्ञानिक केवल यहाँ नहीं उड़ीसा। में भी और पूरे हिंदुस्तान में जाएँगे दो हज़ार एक सौ सत्तर टीमें जय जवान जय किसान अटल जी ने जोड़ा जय विज्ञान तो मोदी जी ने कहा जय अनुसंधान अनुसंधान मतलब प्रयोग जो हुए वो वैज्ञानिक लेके आयी और कृपया करके आप उससे सीखिए आपको खेती कोई सिखा नहीं सकता आप करते हैं लेकिन नई चीज़ें जो उसमें जुड़ी उनको सीख के अपना उत्पादन और बढ़ाओ ना मेरे भाई।**

**कृषिसंकल्प अभियान-परभणी**

विकसित कृषी संकल्प अभियानाचं राज्यस्तरीय उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल परभणीमध्ये झालं. याच अभियानाचा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या बैठकीचं उद्घाटन काल वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालं. यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह शास्त्रज्ञ, कृषी अधिकारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून जिल्ह्यातील गावांमध्ये चित्ररथ मार्गस्थ करण्यात आला. येत्या 12 जूनपर्यंत देशभरात हे अभियान राबविण्यात येणार आहे. राज्यात हे अभियान कृषी विभाग आणि 50 कृषि विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून चार हजार 500 गावांमध्ये राबवलं जाणार आहे. अमेरिकन कपाशीच्या तीन सरळ वाणांचं लोकार्पणही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**शासनाच्या वेगवेगळ्या योजना ज्या आपण केलेल्या आहेत त्या योजनांच्या माध्यमातून आमच्या शेतकऱ्याला आम्ही या दुष्टचक्रातून कसं बाहेर काढू शकू, अशा प्रकारचा आपला प्रयत्न आहे सातत्याने ज्या काही अडचणी आपल्याकडे येतात. त्या अडचणींचा विचार करून आपण नवीन वाढ तयार करतो, जेव्हा पावसाची आवश्यकता त्यावेळी पाऊस न आल्यामुळे त्यामुळे वातावरणातल्या बदलाचा हा जो काही आपल्यावर परिणाम होतो आहे, त्यामुळे असा ताण सहन करणारं वाण हे आपल्याला कसं देता येईल प्रत्येक पिकावर नवनवीन रोग या ठिकाणी तयार होत आहेत या रोगांचा रेझिस्टन्स करणारं वाण आपल्याला कसं तयार करता येईल, अशा प्रकारचं संशोधन हे आपण सातत्याने करतो आहोत.**

**गुंतवणूक**

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात एक लाख 64 हजार 874 कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ही गुंतवणूक देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या 40 टक्के इतकी आहे. त्याआधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही गुंतवणूक 32 टक्के अधिक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत 25 हजार 441 कोटी इतकी परकीय गुंतवणूक आली. राज्याची ही घोडदौड अशीच सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी, जनतेचं अभिनंदन केलं.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 148 व्या तुकडीचं दीक्षांत संचलन आज होत आहे. मिझोरामचे राज्यपाल आणि माजी लष्कर प्रमुख व्ही के सिंग या संचलनाची पाहणी करणार आहेत. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय सैन्य दलात दाखल होणाऱ्या पहिल्या महिला तुकडीचा संचलनातील सहभाग हे यंदाच्या संचलन सोहळ्याचं वैशिष्ट्य आहे. दरम्यान काल 148व्या तुकडीचा दीक्षांत सोहळा पार पडला. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर पूनम टंडन या सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय सैन्य दलात दाखल होणाऱ्या पहिल्या महिला तुकडीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. ही तुकडी समस्त महिलांसाठी आदर्श आहे, असं प्रतिपादन डॉक्टर पूनम टंडन यांनी यावेळी केलं. या सोहळ्यात 339 छात्रांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये 17 महिलांचा समावेश आहे. छात्र श्रीती दक्ष महिला तुकडीमध्ये कला शाखेत प्रथम आली. श्रीतीला कमांडंट रौप्य पदकाने सन्मानित करण्यात आलं. बिटेक शाखेचं कमांडंट रौप्य पदक उदयवीर सिंग नेगी याला, विज्ञान शाखेचं लकी कुमार याला; तर संगणक विज्ञान शाखेचं पदक प्रिन्स कुमारसिंग कुशवाह याला प्रदान करण्यात आलं.

**शिंदे वारी**

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसंच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या बुधवारी विशेष आढावा बैठक पार पडली; त्याविषयीची माहिती प्रसार माध्यमांना काल देतांना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे पथकरात सवलत दिली जाईल, असंही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**अवयवदान-सांगली**

राज्य शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये अवयवदानाची ऐच्छिक चळवळ आगामी चार महिन्यात राबवण्यात येणार आहे. यासाठी क्यूआर कोड तयार करण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यातील विविध कार्यालयांमध्ये या क्यूआर कोडचं लोकार्पण जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या काल करण्यात आलं. यावेळी काकडे यांनी नागरिकांना अवयवदान करण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले...

**अवयव दान हे अत्यंत पुण्यकारक असं कार्य आहे आम्ही सर्वांनी ठरवलंय सांगली जिल्ह्यात की आपण अवयव दान करायचं आहे आणि त्यासाठी आज कलेक्टर ऑफिसमध्ये आम्ही त्याचा एक क्यूआर कोड आम्ही त्याचं इनॉगुरेशन केलं आणि तो स्कॅन केला तर तात्काळ आपल्याला एनजीओ च्या त्या साईटवर आपण अपलोड होतो आणि आपल्या मृत्यूनंतर मात्र ते त्याचा पाठपुरावा करतात मी सर्वांना या निमित्तानं आवाहन करतोय सांगलीतील सर्व कार्यालयांमध्ये हे क्यूआर कोड लावूयात आणि जास्तीत जास्त लोकांना पटवून सांगायचं की अवयवदानाचं महत्व काय आहे.**

**नंदघर-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील 100 अंगणवाड्यांचं 'नंदघर'मध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. त्यात ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध असणार आहे. या केंद्रात सकाळच्या सत्रात बालकांना शिक्षण आणि पोषण आहार दिला जाईल, तर दुपारच्या सत्रात महिलांसाठी आरोग्य आणि उद्योजकतेबाबत जनजागृतीपर कार्यक्रम राबवले जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम गडचिरोलीमध्ये राबवण्यात येत आहे.

**आशियाई ॲथलेटिक्स**

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेनं काल तीन किलोमीटर अडथळ्याच्या शर्यतीत सुवर्ण पदक पटकावलं. अवघ्या आठ मिनिट 20 सेकंद आणि 92 मिनी सेकंदात त्यानं ही शर्यत पूर्ण केली. यापूर्वी 2019 मध्ये दोहा इथं झालेल्या स्पर्धेत अविनाश साबळेनं रौप्य पदक पटकावलं होतं.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चंदिगडमध्ये झालेल्या पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु संघानं पंजाब किंग्जवर 8 गडी राखून विजय मिळवला आणि स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. पंजाब किंग्ज संघानं दिलेलं 102 धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्सनं केवळ 10 षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. आज मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात टायटन्सशी होईल. यातील विजेता संघ 1 जून रोजी दुसऱ्या पात्रता सामन्यात पंजाब किंग्ज संघाबरोबर खेळेल. आणि या सामन्यातील विजेता संघ 3 जूनला अहमदाबादमध्ये अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूशी लढत देईल.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात पावसाने विश्रांती घेतली आहे. जालना शहरासह जिल्ह्यात मात्र काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. रत्नागिरी जिल्ह्यातही काल अधून मधून पावसाच्या सरी कोसळल्या. येत्या 24 तासात कोकणात काही ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा अहवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.